# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.02.2026** **वार- शनिवार**

---

**जयसेविजय**

लष्कराच्या दक्षिण कमांड मुख्यालयात भविष्यासाठी सज्ज सशस्त्र दलांच्या उभारणीसाठी संयुक्तता, आत्मनिर्भरता, नवोन्मेष आणि लष्करी नागरी एकत्रीकरणावर लक्ष केंद्रित करणारा जय से विजय हा परिसंवाद पार पडला. एकात्मिक, भविष्यासाठी सज्ज आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम दल तयार करण्याच्या दिशेनं गेले दोन दिवस त्याचं आयोजन करण्यात आलं. वरिष्ठ लष्करी अधिकारी, माजी सैनिक, शास्त्रज्ञ, उद्योजक, स्टार्ट-अप्स आणि शैक्षणिक तज्ञ यामध्ये सहभागी झाले होते. परिसंवादाच्या प्रमुख भाषणात, संरक्षण दलाचे प्रमुख जनरल अनिल चौहान, यांनी विजयाचा मार्ग म्हणून संयुक्तता, आत्मनिर्भरता आणि नवोन्मेष या तीन स्तंभांवर भर दिला.भविष्यातील सैन्य तयारीसाठी तंत्रज्ञान अधिग्रहण आणि संस्थात्मक परिवर्तन महत्त्वाचं असल्याचं ते म्हणाले.

**निक्षय**

क्षयरोगमुक्त भारताच्या अनुषंगानं केंद्र शासनानं सुरु केलेल्या निक्षय मित्र योजनेच्या अंमलबजावणीत दादर विभागानं प्रथम, तर पुणे महापालिकेनं द्वितीय क्रमांक पटकावला आहे. क्षयरोगग्रस्तांना पोषणात्मक आधार देण्यासाठी सुरू केलेल्या या योजनेअंतर्गत दादरमध्ये गेल्या तीन वर्षांत 21 हजार 504, तर पुणे शहरात 19 हजार 900 फूड बास्केटचं वितरण करण्यात आलं. त्यामुळे हजारो रुग्णांना

पोषण आणि उपचारांमध्ये मोठा आधार मिळाला. राज्यात विविध ठिकाणी शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्यानं मोठ्या प्रमाणावर रुग्णांपर्यंत पोषण आहार पोहोचवण्यात आला. योजना अधिकाधिक रुग्णांपर्यंत पोहचविण्यासाठी आणि जास्तीत जास्त निक्षय मित्रांची नोंदणी करून घेण्याकरिता महापालिका प्रयत्नशील आहे असं पुणे महापालिकेचे क्षयरोग अधिकारी डॉक्टर प्रशांत बोठे यांनी सांगितलं.

**आयुष**

महाराष्ट्र शासनाच्या आयुष संचालनालयाच्या सहकार्यानं ट्रिनिटी ग्रुप आणि चेंबर फॉर इम्पोर्ट, एक्स्पोर्ट अँड हेल्थ यांच्याद्वारे १८ ते २० फेब्रुवारी या कालावधीत तीन दिवसांचे 'आयुष-विकसित भारत महावर्ल्ड एक्स्पो’  चं पुण्यात आयोजन करण्यात आलं असल्याची माहिती संयोजक डॉक्टर जोसेफ डायस यांनी पत्रकार परिषदेत दिली. यामध्ये आयुष, अन्न, ऊर्जा, सेंद्रिय उत्पादनं, पर्यटन आदी क्षेत्रांचा समावेश असून विविध राज्यांतील प्रदर्शक, शासकीय संस्था आणि खासगी उद्योग सहभागी होणार आहेत.

**ईकॉमर्स**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार व्यवसाय प्रशिक्षण विषयांची तोंड ओळख व्हावी यासाठी सुरू असलेल्या रमणबाग प्रशालेतील, सक्षम प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ई-कॉमर्स वेबसाईटचं उद्घाटन आज करण्यात आलं. अवधूत भिडे,आयुष बोबडे आणि चिन्मय मराठे या विद्यार्थ्यांनी हे संकेतस्थळ शिक्षक प्रीतम जगदाळे यांच्या मार्गदर्शनात तयार केलं आहे. त्याद्वारे आवश्यक साहित्य इत्यादीची खरेदी ऑनलाइन पद्धतीनं करता येणार आहे.

**अभिवाचन**

पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी छात्र प्रबोधन आणि मातृमंदिर विश्वस्त संस्था यांच्याद्वारे आयोजित राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धेत पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर विद्यालयानं प्रथम क्रमांक पटकावला आहे.

लातूर जिल्ह्यातल्या हरंगळू इथल्या जनकल्याण निवासी विद्यालयानं द्वितीय,कणकवलीमधल्या कसाल इथल्या विद्यानिकेतन कॉन्व्हेंट स्कूलनं तृतीय क्रमांक मिळविला. तसंच निगडी इथल्या ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय आणि आंबेजोगई इथल्या स्वामी विवेकानंद बाल विद्यालयानं उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केलं.

**अभय**

पुणे महापालिकेच्या मिळकतकर थकबाकीदारांसाठी राबविण्यात येत असलेल्या अभय योजनेला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सभागृह नेते गणेश बिडकर यांनी महापालिका आयुक्तांकडे यासंदर्भात मागणी केली होती. अभय योजनेअंतर्गत मिळकतकराच्या थकीत रक्कमेवर ७५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत आहे. १३ फेब्रुवारीपर्यंत सुमारे १ लाख ३५ हजारांहून अधिक मिळकतधारकांनी या योजनेचा लाभ घेतला असून ८०१ कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल महापालिकेला प्राप्त झाला आहे.

**पवार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना आज रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.  गेले पाच दिवस त्यांच्यावर उपचार सुरु होते. डॉक्टरांनी त्यांना विश्रांती घेण्याच्या सल्ला दिला आहे.

**शिवजयंती**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने १५ ते १९ फेब्रुवारी  या कालावधीत शहरात विविध ठिकाणी ‘छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६’  या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. निगडी इथल्या भक्ती शक्ती समूह शिल्प उद्यान इथं उद्या याचं उद्घाटन होणार आहे

**स्नेह**

भोर एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित मूकबधिर विद्यालय, पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विद्यालयाचं संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडलं. पहिल्या दिवशी विविध गुणदर्शन या कार्यक्रमात सर्वच विद्यार्थ्यांनी २४ कार्यक्रम सादर केले. त्यानंतर वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ झाला.

**<u>सौरऊर्जा</u>**

पुण्यातील 'मास्मा रिन्युएबल एनर्जी एक्स्पो २०२६' या सौर ऊर्जा प्रदर्शनाचं उद्घाटन काल पुणे महापालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते करण्यात आलं. शिवाजीनगरमधील नवीन कृषी महाविद्यालय मैदानावर हे प्रदर्शन सुरू आहे.

**<u>कारवाई</u>**

सिग्नलचं उल्लंघन, निर्धारित वेगापेक्षा अधिक वेगानं वाहन चालविणं, मालवाहू वाहनातून प्रवासी वाहतूक आदी गुन्ह्यांसंदर्भात पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं ३ हजार ६०० वाहन परवाने निलंबित केले आहेत. परवाना निलंबित झालेला चालक पुन्हा वाहन चालविताना आढळल्यास त्याला ५ हजार रुपयांचा दंड केला जाणार आहे. मागील वर्षभरात परिवहन विभागानं ३ हजार ६०० वाहन परवाने निलंबित केले आहेत. वाहतूक नियमांचं उल्लंघन करणाऱ्या चालकांवर सातत्यानं कारवाई केली जाईल. असं पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी सांगितलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**